इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३८
दि. २७/०३/२०२६

**दुख:वटा ठराव**

नगरसेविका तेजश्री अमृत भोसले यांची भाची कु. राजनंदीनी सुरज मगदुम हिचे रक्तातील संधीवाताने वयाच्या आठव्या वर्षी दि. १२/०३/२०२६ रोजी दु:खद निधन झाले आहे.

कु. राजनंदीनीच्या निधनाने मगदुम व भोसले कुटुंबियांवर कोसळलेल्या दु:खात हि सभा सहभागी होत आहे.

ईश्वर तिच्या आत्म्यास चिरशांती देवो.

सूचक : संतोष अंजना आप्पुराव शेळके :-

अनुमोदक : सौ. सपना प्रमोद भिसे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३९
दि. २७/०३/२०२६

**दुख:वटा ठराव**

राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांचा विचार जगभर रुजविणारे संशोधन आणि ज्ञानाच्या प्रकाशाने महाराष्ट्राच्या इतिहासातील सत्य पैलु उजळवून टाकणारे आणि समाजाला वैचारिक दिशा दाखवणारे मराठा इतिहासाचे गाढे अभ्यासक व विचारवंत प्रा. डॉ. जयसिंगराव पवार यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी दु:खद निधन झाले आहे.

त्यांच्या निधनाने एक अभ्यासु इतिहास संशोधक महाराष्ट्राने गमावला आहे.

त्यांच्या निधनाने जयसिंगराव पवार यांचे कुटंबिय व महाराष्ट्रातील इतिहासप्रेमी यांच्यावर ओढविलेल्या दु:खात आजची सभा सहभागी होत आहे.

ईश्वर तिच्या आत्म्यास चिरशांती देवो.

सूचक : संतोष अण्णा बाबुराव शेळके :- Santosh

अनुमोदक : मोनाजी दत्तात्रय मांजरे. MDManjre

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४०
दि. २७/०३/२०२६

विषय क्र. १ : इचलकरंजी महानगरपालिकेचे सन २०२५-२०२६ सालाचे सुधारीत व सन २०२६-२०२७ सालाचे वार्षिक अंदाजपत्रक मा. स्थायी समिती ठराव क्र. १/ दि. १२/०३/२०२६ नुसार मंजुर करणे.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेचे सन २०२५-२०२६ सालाचे सुधारीत व सन २०२६-२०२७ सालाचे वार्षिक अंदाजपत्रक मंजुरी कामी मा. स्थायी समिती ठराव क्र. १/ दि. १२/०३/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस वाचणेत आली.

वरील प्रमाणे मा. स्थायी समितीने केलेल्या शिफारशी शिवाय खालील प्रमाणे दुरुस्त्या आजच्या महासभेमध्ये सुचविणेत येत आहेत. अंदाजपत्रकीय तरतुदीमधील महसुली जमेच्या बाजुस मुद्रांक शुल्कामध्ये रु. ३ कोटी, सेप्टीक टँक कर रु. ५९.७० लाख, भुईभाडे रु. २० लाख, म्युनसिपल इमारत भाडे ५० लाख वाढ याप्रमाणे महसुली जमा बाजुस ४.३० कोटी वाढ धरणेत यावी, तर महसुली खर्चामध्ये हेड ऑफीस फोन बिल रु. १५ लाख ऐवजी रु.५ लाख,अंशदान निवृत्ती वेतन योजना स्तर - १ रु. २ कोटी ५० लाख ऐवजी रु.१ कोटी ०९ लाख , घनकचरा व्यवस्थापनासाठी रु. २० कोटी ऐवजी रु १८ कोटी, वॉटरसेस भरणे रु. ८ कोटी ऐवजी रु. ७ कोटी, वाहने भाड्याने घेणे रु. २ कोटी ऐवजी रु. १ कोटी ८० लाख, भुयारी गटार योजना / देखभाल दुरुस्ती रु. ६ कोटी ऐवजी रु. ५ कोटी , स्वातंत्र्य दिन / प्रजासत्ताक दिन / संविधान दिन व इतर समांरभ साजरे करणे /मंडप टेबल खुर्च्या इ व सत्कार मानपत्र देणे.इ.रु. १५ लाख ऐवजी ५० लाख , सभासद प्रवास, प्रशिक्षण रु. २ लाख ऐवजी रु. ५० लाख करणेत येत आहे. स्वच्छता टँकर भाडे रु. १९ लाख ९० हजार वगळणेत यावे,

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मागासवर्गीय कल्याण समिती मार्फत फक्त मागासवर्गीय समाज यांचेसाठीच योजना न राबविता समाजातील सर्वच आर्थिक दुर्बल स्तरातील नागरीकांसाठी, दिव्यांग तसेच तृतीय पंथी यांचेसाठीच्या समाजकल्याणकारी योजना राबविणेत याव्यात यासाठी सद्या दिव्यांग कल्याण कार्यक्रम, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक खर्च, समाजकल्याण विभागाकडील योजना राबविणे या तीन शिर्षांवर अनुक्रमे २० लाख, ८० लाख, व १० लाख याप्रमाणे अतिरीक्त १.१० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतुद करणेत यावी. सदर विशेष समितीचे नाव मागासवर्गीय कल्याण समिती ऐवजी समाजकल्याण समिती असे नाव दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव पुढील महासभेमध्ये घेणेत यावा व सदर समितीमध्ये मागासवर्गीय ६ सदस्यांबरोबरच अन्य दोन सदस्यही नियुक्ती करणेत यावेत. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, रा. छ. शाहु महाराज पुतळा, महात्मा गांधी पुतळा, ना. बा. घोरपडे सरकार पुतळा इत्यादी सुशोभिकरणाकरीता स्वतंत्र गौण लेखाशिर्ष तयार करुन त्याकरीता टोकण म्हणुन रु १५ लाखाची तरतुद करणेत येत आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या पदाधिकारी पैकी आयुक्त, अति. आयुक्त, उपायुक्त यांना महापालिकेमार्फत वाहन उपलब्ध करुन देणेत यावे. तर इतर अनुज्ञेय अधिकाऱ्यांना वाहन ऐवजी वाहन भत्ता देणेसाठी अधिकारी वाहन भत्ता हे हेड निर्माण करणेत यावे त्यासाठी तरतुद रु. ६० लाख करणेत येत आहे.

घनकचरा व्यवस्थापनासाठी वाहने, ट्रॅक्टर, जेसीबी, पोकलॅण्ड यासाठी शासनाकडे अनुदान मागणी करणेत यावी. तसेच शासकीय पाणीपट्टी वर आकारण्यात येणारा दंड, सेस रद्द करणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत यावा.

Scanned with OKEN Scanner

महानगरपालिकेचे उत्पन्न वाढणेकरीता जुनी झालेली शॉपिंग सेंटर इमारती पाडुन त्याठिकाणी शहराच्या मध्यवर्ती व महत्वाच्या ठिकाणी असणाऱ्या या जागेवर आधुनिक पद्धतिचे व्यापारी संकुल उभारणेकरीता शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव पाठविणेत यावा.

महसुली जमेमध्ये करणेत आलेली वाढ व महसुली खर्चामध्ये करणेत आलेली कपात यामुळे शिल्लक राहणाऱ्या रक्कमेतुन महानगरपालिकेच्या सदस्यांसाठी प्रत्येकी रु. ७.५० लाख याप्रमाणे ५.३२ कोटी वार्षिक स्वेच्छानिधी देणेत यावा. तसेच महापौर, उपमहापौर, सभागृहनेता, विरोधीपक्षनेता यांना प्रत्येकी ५० लाख याप्रमाणे २ कोटी पदाधिकारी विशेष स्वेच्छा निधी देणेत यावा. या दोन्ही लेखाशिर्षांची स्वतंत्र निर्मीती करणेत यावी. ज्यामुळे त्यांचे प्रभागातील किरकोळ स्वरुपाची कामे सदर स्वेच्छा निधीतुन सदस्यांना करुन घेता येतील.

याशिवाय शिक्षण विभागाकरीता सद्या असणाऱ्या तरतुदीमध्ये रु. २ कोटी अतिरिक्त वाढ करणेत यावी. तसेच शिक्षण समितीकडे यापुर्वी नमुद असनाऱ्या म.न.पा शिक्षण विभाग प्राथमिक शाळाअंतर्गत अनुदान या लेखाशिर्षा अंतर्गत करणेत यावी. शिक्षण विभागास अनुदान (५०% हिस्सासाठी) रु. ३०कोटी ऐवजी २५ कोटी ८० लाख तरतुद करणेत येत आहे

इचलकरंजी शहरामध्ये सेफ सिटी योजनेअंतर्गत सी. सी. टि. व्ही. कॅमेरे बसविणेत आले आहेत. तथापि निगराणी अभावी अनेक ठिकाणचे कॅमेरे बंद आहेत. त्यांचे देखभाल दुरुस्ती करीता स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करुन रु. २५ लाखाची तरतुद करणेत यावी. रेकॉर्ड जतन करणे / डिजीटल स्कॅनिंग करणे यामध्ये अतिरिक्त रु. ५० लाख वाढ करणेत यावी. नगरसेवक व पालिका कर्मचारी व इतरांना ओळखपत्र देणे सुरक्षा यंत्रणा बसविणे इ. साठी स्वतंत्र गौण शिर्ष तयार करुन त्यावर टोकण म्हणून रु. १० लाखाची तरतुद करणेत येत आहे.

याचबरोबर महिला व बालकल्याण विभागासाठी नियमित तरतुदीशिवाय महीला बालकल्याण निधी अतिरिक्त ४ कोटी ची तरतुद करणेत येत आहे.

या करणेत आलेल्या तरतुदी शिवाय महिला बचत गटांसाठी बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, नाविन्यपुर्ण प्रशिक्षण व उपक्रमासाठी शासनाकडुन ५ कोटी रुपयांचा निधी मिळणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविणेत यावा. तसेच याकरिता भांडवली जमा खर्चाचे स्वतंत्र उपशिर्षक तयार करणेत यावे.

परिवहन विभागाच्या परिवहन सेवा खर्च या उपशिर्षावर अतिरिक्त १.५० कोटी तरतुद करुन या शिर्षाकरीता एकुण ४ कोटी १० लाख इतकी तरतुद करणेत येत आहे.

न्यायसंकुलासाठी विधी व न्याय विभागाकडे हस्तांतरीत केलेल्या महासत्ता चौक येथील जमिनीच्या मोबदल्यापोटी र.रु. १५ कोटी ३३ लाख जमा होणार आहे. ती सर्व रक्कम एक्विझिशन जागा खरेदी म.न.पा फंड या गौण शिर्षांअंतर्गत खर्च करणेत यावी. तसे जमा रक्कमेसाठी स्वतंत्र गौण शिर्षक तयार करणेत यावे.

पुर नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या माध्यमातुन शासनातर्फे विविध योजना करणेत येणार आहेत. यामध्ये इचलकरंजी महापालिका हद्दीतील सुमारे ४५० कोटी रु कामाचा समावेश आहे. सदरचे काम अंतिम टप्यात असलेने या कामाकरीता भांडवली जमा खर्च या शिर्षाखाली नविन उपशिर्षाची World Bank पुरनियंत्रण प्रकल्प MRDP योजना करीता र. रु. ११५ कोटी १७ लाखाची तरतुद करणेत येत आहे.तसेच महसुली शासकीय व अन्य पुरवठादार आणि कंत्राटदार यांचे प्रलंबित बिले रु. १५ कोटी ऐवजी रु. १३ कोटी ची तरतुद करणेत येत आहृ

त्याचप्रमाणे सदरील अंदाजपत्रकात शासन अनुदानाबाबत जे अंदाज धरण्यात आले आहेत त्यामध्ये चालू आर्थिक वर्षात अतिरिक्त निधी प्राप्त झालेस त्याप्रमाणे सुधारित अंदाज धरुन त्याप्रमाणे अंदाजपत्रकात व बजेट सॉफ्टवेअरमध्ये सुधारणा करणेबाबत मा. आयुक्तांनी कार्यवाही करणेबाबत मान्यता देण्यात येत आहे.

उद्यान विभाग व महापालिकेच्या व्यायामशाळा, योगा हॉल या ठिकाणी देखभाल दुरुस्ती करीता कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ उपलब्ध करणेसाठी स्वतंत्र शिर्ष निर्माण करुन त्यासाठी रु. ५५ लाख रक्कमेची तरतुद करणेत येत आहे.

शहराच्या सर्व प्रवेशद्वारांवर स्वागतकमानी बांधणेकरीता भांडवली जमा व खर्च बाजुस स्वतंत्र शिर्ष तयार करुन त्यावर र.रु. ५० लाखाची तरतुद करणेत येत आहे.

वरील प्रमाणे सुचविणेत आले नुसार सन २०२६-२७ चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे दुरुस्त्या करणेत येत आहेत.

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | भाग - एक महसुली प्राप्त रक्कम | स्थायी समिती ठराव नं.१ दि.१२-३-२०२६ | वाढ | घट | मा. महासभा ठराव क्र. ४० दि. २७/०३/२०२६ |
|---|---|---|---|---|---|
| ख | **अभिहस्तांकितब महसुल आणि भरपाई** | | | | |
| १ | मुद्रांक शुल्क अनुदान | १,००,००,००० | ३,००,००,००० | - | ४,००,००,००० |
| घ | **महानगरपालिका मालमत्ते पासून भाडयाचे उत्पन्न** | | | | |
| २ | भुई भाडे | १०,००,००० | २०,००,००० | | ३०,००,००० |
| ११ | म्युनिसपल इमारत भाडे (गाळा भाडे) | ७०,००,००० | ५०,००,००० | | १,२०,००,००० |
| ३३ | परिवहन सेवा उत्पन्न | २,६०,००,००० | १,५०,००,००० | | ४,१०,००,००० |
| ड | **फी वापरकर्ता आकार आणि द्रव्यदंड यापासून मिळणारे उत्पन्न** | | | | |
| १६ | सेप्टिक टँक उपसा कर | ३५,७१,३५० | ५९,७०,००० | | ९५,४१,३५० |
| च | **विक्री व भाडे आकार यापासून उत्पन्न** | | | | |
| ४ | न्याय संकुलासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयकडे जमीन हस्तांतरण मोबदला | | १५,३३,६०,९४९ | | १५,३३,६०,९४९ |
| | Total | ४,७५,७१,३५० | २१,१३,३०,९४९ | - | २५,८९,०२,२९९ |

| | **भाग - दोन ( महसुली खर्च )** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क | **आस्थापना खर्च** | | | | |
| ७२ | अंशदान निवृत्ती वेतन योजना स्तर — १ | २,५०,००,००० | | १,४०,९०,००० | १,०९,१०,००० |
| ख | **प्रशासकीय खर्च** | | | | |
| १३ | हेड ऑफिस फोनची बिल खर्च | १५,००,००० | | १०,००,००० | ५,००,००० |
| २५ | सभासद प्रवास खर्च व प्रशिक्षण | २,००,००० | ४८,००,००० | | ५०,००,००० |
| ५६ | रेकॉर्ड जतन करणे / डिजीटल स्कॅनिंग करणे | १०,००,००० | ५०,००,००० | | ६०,००,००० |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **घ** | **मत्तांची दुरुस्ती व परिरक्षण** | | | | |
| १९ | भुयारी गटार योजना / देखभाल दुरुस्ती | ६,००,००,००० | | १,००,००,००० | ५,००,००,००० |
| ३६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुत्ळा , रा.छ. शाहू महाराज पुतळा, महात्मा गांधी पुतळा, ना. बा. घोरपडे सरकार पुतळा सुशोभिकरण करणे इत्यादी | | १५,००,००० | | १५,००,००० |
| ३७ | महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधी (प्रत्येक नगरसेवक यांना ७.५० लाख यांप्रमाणे) | | ५,३२,५०,००० | | ५,३२,५०,००० |
| ३८ | पदाधिकारी विशेष स्वेच्छा निधी (महापौर, उपमहापौर , सभागृह नेता, विरोधीपक्षनेता यांना प्रत्येकी ५० लाख यांप्रमाणे ) | | २,००,००,००० | | २,००,००,००० |
| ३९ | सि.सि.टि.व्ही कॅमेरे देखभाल व दुरुस्ती करणे ( मनपा निधी ) | | २५,००,००० | | २५,००,००० |
| ४० | नगरसेवक व महानगरपालिका कर्मचारी व इतरांना ओळखपत्र दणे सुरक्षा यंत्रणा बसविणे | | १०,००,००० | | १०,००,००० |
| ४१ | अधिका-यांना वाहन ऐवजी वाहन भत्ता देणे | | ६०,००,००० | | ६०,००,००० |
| ४३ | परिवहन सेवा खर्च | २,६०,००,००० | १,५०,००,००० | | ४,१०,००,००० |
| **त्र** | **व्यवहार आणि कार्यक्रम अंमलबजावणी करिता खरेदी** | | | | |
| २ | वॉटरसंस भरणे | ८,००,००,००० | | १,००,००,००० | ७,००,००,००० |
| २५ | घनकचरा व्यवस्थापन म.न.पा. फंडातून खर्च | २०,००,००,००० | | २,००,००,००० | १८,००,००,००० |
| २६ | वाहन / वाहन चालक भाडयाने घेणे | २,००,००,००० | | २०,००,००० | १,८०,००,००० |
| ३३ | स्वातंत्र्य दिन / प्रजासत्ताक दिन / संविधान दिन व इतर समारंभ साजरे करणे /मंडप टेवल खुर्च्या इ व सत्कार मानपत्र देणे.इ. | १५,००,००० | ३५,००,००० | | ५०,००,००० |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | सार्व.संडास मुतारी स्वच्छता करणेसाठी टँकर भाड्याने घणे | २०,००,००० | | १९,९०,००० | १०,००० |
| ४२ | उद्यान विभाग व महानगरपालिकेच्या व्यायामशाळा , योगा हॉल या ठिकाणी देखभाल दुरुस्ती करीता कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ सेवा घेणे | | ५५,००,००० | | ५५,००,००० |
| च | **दिलेली महसुली अनुदाने, अंशदान व अर्थसहाय्य** | | | | |
| २ | शिक्षण विभागास अनुदान (५०% हिस्सासाठी) | ३०,००,००,००० | | ४,२०,००,००० | २५,८०,००,००० |
| ८ | म.न.पा शिक्षण विभागा प्रथमिक शालांतर्गत अनुदान | ५,०५,००,००० | २,००,००,००० | | ७,०५,००,००० |
| छ | **तरतुदी आणि निर्लेखित करणे** | | | | |
| ५ | महिला बालकल्याण निधी | २९,००,००० | ४,००,००,००० | | ४,२९,००,००० |
| ६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक कल्याणकारी खर्च | २९,००,००० | ८०,००,००० | | १,०९,००,००० |
| ७ | दिव्यांग कल्याण कार्यक्रम | २९,००,००० | २०,००,००० | | ४९,००,००० |
| ८ | समाजकल्याण विभागाकडील कल्याणकारी योजना राबविणे | २०,००,००० | १०,००,००० | | ३०,००,००० |
| ज | **राखीव निधी व संकीर्ण खर्च** | | | | |
| ३३ | महसुली शासकीय व अन्य पुरवठादार आणि कंत्राटदार यांचे प्रलंबित बिले | १५,००,००,००० | | २,००,००,००० | १३,००,००,००० |
| | **Total** | ९२,८४,००,००० | १८,९०,५०,००० | १२,१०,८०,००० | ९९,६३,७०,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **भाग - तीन भांडवली जमा** | | | | |
| ५७ | महिला बचत गटांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे नाविन्युपर्ण प्रशिक्षण व उपक्रमासाठी निधी ( शासकीय निधी ) | - | ५,००,००,००० | - | ५,००,००,००० |
| ५८ | World Bank पुरनियंत्रण प्रकल्प MRDP योजना | - | १,१५,१७,४१,१७७ | - | १,१५,१७,४१,१७७ |
| ५९ | शहराच्या सर्व प्रवेशद्वारांवर स्वागत कमानी बांधणे ( शासकीय निधी ) | - | ५०,००,००० | - | ५०,००,००० |
| | **Total** | - | १,२०,६७,४१,१७७ | - | १,२०,६७,४१,१७७ |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **भाग - चारभांडवली खर्च** | | | | |
| १ | ऑक्विझिशन जागा खरेदी (म.न.पा.फंड) | १०,००,००,००० | १५,३३,६०,९४९ | - | २५,३३,६०,९४९ |
| ५८ | रस्ताव खुदाई अंतर्गत खर्च | १०,००,००,००० | | १,००,००,००० | ९,००,००,००० |
| ९९ | महिला बचत गटांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे नाविन्युपर्ण प्रशिक्षण व उपक्रमासाठी निधी ( शासकीय निधी ) | - | ५,००,००,००० | - | ५,००,००,००० |
| १०० | World Bank पुरनियंत्रण प्रकल्प MRDP योजना | - | १,१५,१७,४१,१७७ | - | १,१५,१७,४१,१७७ |
| १०१ | शहराच्या सर्व प्रवेशद्वारांवर स्वागत कमानी बांधणे ( शासकीय निधी ) | - | ५०,००,००० | - | ५०,००,००० |
| | **Total** | २०,००,००,००० | १,३६,०१,०२,१२६ | १,००,००,००० | १,५५,०१,०२,१२६ |

वरील तक्त्यानुसार बदल केल्याने खालील प्रमाणे घोषवारा तक्ता

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी**
**नमुना नं. ८२ (नियम क्रमांक ३८७)**
**जमा व प्रदाने लेखा**

| लेखा सांकेतांक | बाबीचे नांव जमेचे | सुधारीत अंदाजपत्रक सन २०२५-२६ | अंदाजपत्रक सन २०२६-२७ | लेखा सांकेतांक | बाबीचे नांव खर्चाचे | सुधारीत अंदाजपत्रक सन २०२५-२६ | अंद[illegible] सन २०[illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **प्रारंभिक शिल्लक** | **१,७३,९८,९६,३६७** | **१,३४,२६,४५,६८७** | | | | |
| ११०० | क) कर महसुल | ५१,८२,९२,००० | ५३,४८,९१,८५० | २१०० | क) आस्थापना खर्च | १,२५,१५,६६,२९० | १,४७,[illegible] |
| १२०० | ख) अभिहस्तांकित महसुल आणि भरपाई | ४,७८,७९,४२२ | ४,३५,००,००० | २२०० | ख) प्रशासकीय खर्च | २८,९२,१०,००० | ३६,[illegible] |
| १३०० | ग) महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | १,३१,३०,२०,००० | १,४७,९५,८०,७०० | २३०० | ग) व्याज व वित्त आकार | १७,०२,००० | |
| १४०० | घ) महानगरपालिका मालमत्तेपासून भाडयाचे उत्पन्न | ५,५९,२३,१४६ | ८,४७,९२,००० | २४०० | घ) मत्तांची दुरुस्ती व परिरक्षण | ३९,९५,५५,००० | ४२,[illegible] |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५०० | ड) | फी वापरकर्ता आकार आणि द्रव्यदंड यापासून मिळणारे उत्पन्न | २३,२०,८१,८४५ | २२,१५,१२,८५० | | २५०० | ञ) | व्यवहाराकरिता आणि कार्यक्रम अंमलबजावणी करिता खरेदी | २६,०२,५०,००० | ५०,३७,६०,००० |
| १६०० | च) | विक्री व भाडे आकार यापासून उत्पन्न | १८,६१,००० | १५,६०,७१,९४९ | | २७०० | च) | दिलेली महसुली अनुदाने, अंशदान व अर्थसहाय्य | १८,३८,००,००० | ३५,७७,००,००० |
| १७०० | छ) | व्याजापासूनचे उत्पन्न | ४,५०,३०,००० | ४,६५,३०,००० | | २८०० | छ) | तरतुदी आणि निर्लेखित करणे | १,९२,००,००० | ७,२०,००,००० |
| १८०० | ज) | समपध्दत ठेवी / ना-परतावा ठेवी इत्यादी | १,००० | १,००० | | २९०० | ज) | राखीव निधी व संकीर्ण खर्च | १,१४,४२,३८,९८६ | ७०,५३,९६,००० |
| १९०० | झ) | इतर उत्पन्न | ९५,९८,७३,९८६ | ३५,९३,१४,००० | | | | | | |
| | | **एकूण महसुली जमा** | **३,१७,३९,६२,३९९** | **२,९२,६१,९४,३४९** | | | | **एकूण महसुली खर्च** | **३,५४,९५,२२,२७६** | **३,९०,६२,३५,३१७** |
| ३२०० | क) | विशिष्ट प्रयोजनाकरिता सर्व अनुदाने, अंशदाने | ३,७८,८१,४४,१३७ | ५,३६,९६,३४,९६३ | | ४१०० | क) | स्थिर व जंगम मत्ता | ४,०४,१३,५९,९४० | ६,०१,७७,८७,६३२ |
| ३३०० | ख) | सुरक्षित असुरक्षित कर्ज | १०,००० | १०,००० | | ४७०० | ख) | कर्ज, ॲग्रीम, ठेवी | ७,९७,१०,००० | २,२७,१०,००० |
| ३६०० | ग) | प्राप्त ठेवी | १२,०२,१५,००० | ११,९३,२०,००० | | ४९०० | ज) | इतर मत्ता | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| ३९०० | घ) | इतर दायित्व | २४,१०,१०,००० | २४,२१,९५,००० | | | | | | |
| | | **एकूण भांडवली जमा** | **४,१४,९३,७९,१३७** | **५,७३,११,५९,९६३** | | | | **एकूण भांडवली खर्च** | **४,१७,१०,६९,९४०** | **६,०९,०४,९७,६३२** |
| | | | | | | | | **अखेरची शिल्लक** | **१,३४,२६,४५,६८७** | **३२,६७,०५०** |
| | | **एकूण जमा** | **९,०६,३२,३७,९०३** | **९,९९,९९,९९,९९९** | | | | **एकूण खर्च** | **९,०६,३२,३७,९०३** | **९,९९,९९,९९,९९९** |

सूचक : विकास चोपडे अनुमोदक : प्र.ना. धुत्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner